# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर.

## Govt. MEDICAL COLLEGE & HOSPITAL, NAGPUR.

क्रं.शावैमरुग्णा/पाकगृह/इ.कोटे/निर्लेखन/ ९८५ /२०२६ दिनांक : २४/०७/२०२६

प्रति,

मे.....................

.......................

.......................

विषय : शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील पाकगृह विभागातील रिकामे तेलाचे डब्बे, रिकामे गहु व तांदळाचा बारदाना(स्क्रॅप मटेरीयल) इत्यादी निलेखन साहित्यांची विक्री करुन उचल करण्याचे दरपत्रक मागविणे बाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेमध्ये पाकगृह विभागातील रिकामे तेलाचे डब्बे, रिकामे गहु व तांदळाचा बारदाना(स्क्रॅप मटेरीयल) इत्यादी निर्लेखित झालेल्या साहित्यांची विक्री करुन उचल करण्याचे या पत्राव्दारे दरपत्रके मागविण्यात येत आहे. याकरिता इच्छुक असलेल्या अधिकृत दरपत्रक धारकांनी दरपत्रकाच्या लिफाप्यावर या कार्यालयाचे पत्र क्रमांक, दिनांक व निर्लेखित साहित्यांचे दरपत्रके असे नमुद करुन लिफाफा सिलबंद करुन **मा. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर** या नावे लिहुन वैद्यकीय अधिक्षक यांच्या कार्यालयात सादर करावे. सदर निरुपयोगी साहित्यांचे दरपत्रके स्विकारल्या नंतर तुलनात्मक तक्ता मंजुरीच्या दिनांका पासुन ते एक (१) वर्षाच्या कालावधी करिता वैद्य राहील तसेच दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख दिनांक ०४/०८/२०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील.

खालील स्क्रॅप मटेरियलसाठी सिलबंद दरपत्रके मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र. | स्क्रॅप मटेरियलचे नांव | नग | दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य रिकामे तेलाचे डब्बे (A Type: Good Condition) | उपलब्धतेप्रमाणे | |
| २) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य रिकामे तेलाचे डब्बे (B Type: Average Condition) | उपलब्धतेप्रमाणे | |
| ३) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य रिकामे तेलाचे डब्बे (C Type: Flawed Condition) | उपलब्धतेप्रमाणे | |
| ४) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य रिकामे पोते (A Type: Good Condition) | उपलब्धतेप्रमाणे | |
| ५) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य रिकामे पोते (B Type: Average Condition) | उपलब्धतेप्रमाणे | |
| ६) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य रिकामे पोते (C Type: Flawed Condition) | उपलब्धतेप्रमाणे | |
| ७) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य छोटी पोते | उपलब्धतेप्रमाणे | |
| ८) | पाकगृहातील निरुपयोगी साहित्य प्लॅस्टीक चुगंडी | उपलब्धतेप्रमाणे | |

अटी व शर्ती :-

१) भाग घेणा-या कंपनीने त्यांच्या फार्मच्या अधिकृत लेटरहेड असलेल्या कागदावर निर्लेखित केलेल्या वस्तुंची किंमत त्यांच्या रकाण्यात प्रति किलो ग्रॅम मध्ये नमुद करुन स्वाक्षरी व शिक्का देवुन सिलबंद लिफाफयात सादर करावी. उशिराने प्राप्त होणारा दरपत्रकाचा व सिलबंद नसलेला लिफाफा स्विकारल्या जाणार नाही.

कृ.मा.प.

२) दरपत्रके सादर करण्या-या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, अद्यावत आयकर प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जिएसटी प्रमाणपत्रे सादर करावे.

३) निर्लेखित साहित्याचे प्रमाण कमी किंवा अधिक करण्याची आणि कोणतेही कारण न देता दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर यांची राहील.

४) भाग घेतलेल्या फॉर्म मधुन उच्चतम देयक असणा-या फॉर्मची निवड करण्यात येईल. प्राप्त झालेल्या दरपत्रके उघडविल्या नंतर वाजवी उच्चतम देयक प्राप्त न झल्यास प्रक्रिया रदद करण्याचे अधिकार अधिष्ठातांना राहील.

५) निर्लेखित साहित्याची उचल करणे व सदर साहित्य नेण्याकरिता येणारा खर्च स्थानिक दर पत्र धारकास सोसावयाचा आहे.

६) योग्य रित्या निर्लेखित साहित्यांची वाहतुक करणे व त्याची योग्य विल्हेवाट करणे या करिता लागणा-या विविध विभागाच्या ( उदा.वाहतुक पोलीस विभाग, महानगरपालिका इ.)आवश्यक त्यापरवानगी घेण्याची जबाबदारी यशस्वी फॉर्मची राहील.

७) या संबंधी असलेले सर्व नियमांची पालनकरणे बंधनकारक राहील.

८) आदेश मिळाल्यापासुन व रोख रक्कम रोख विभागात जमा करुन ७ (सात) दिवसाचे आत उचल करावी लागेल.

९) कोणत्याही अटी व शर्ती शिथील करणे अथवा वाढवणे हे आदेश काढणा-यावर अवलंबुन राहील.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर